# प्रकरण पाचवे

## उपसंहार

कवितेचा प्राणभूत भाग आहे, तर तृप्तीचा हुंकार हे तांब्यांच्या कवितेचे स्थायीरस आहे. तांबे स्त्रीपुरुषांचे कवी आहेत, तर गोविन्दाग्रजांच्या कवितेत प्रामुख्याने पुरुष मनाची विरहकातरता व्यक्त झालेली आहे. तांब्यांच्याकडे नाटयगीतांचे आणि त्यातही संवादकाव्यांचे मराठीतील प्रवर्तकत्व जसे येते, तसे गोविन्दाग्रजांकडे येत नाही. दोघांनी भावगीते लिहिलेली असली, तरी भावगीतकवी म्हणून तांब्यांना जे स्थान प्राप्त होते, ते गोविन्दाग्रजांना देता येत नाही. मराठीतील पहिले वीणाकवी तांबेच ठरतात. गोविन्दाग्रजांची रीती गौडी आहे, तर तांब्यांची लाटी आहे.

७] तांबे यांची जीवनदृष्टी आनंदवादी आणि सौंदर्यवादी आहे. त्यांच्या कलावादी साहित्यविचाराचे अधिष्ठान त्यांच्या कवितेला लाभलेले आहे. गोविन्दाग्रजांचे कलाविषयक विचार व्यक्त होण्याला अवसरच लाभलेला नाही.

८] गोविन्दाग्रज आणि तांबे या दोन कवींत महत्त्वाचा फरक म्हणजे गोविन्दाग्रज हे आत्मकेंद्रित कवी आहेत, तर तांबे हे विश्वकेंद्री कवी आहेत. गोविन्दाग्रजांच्या कवितेने तिच्या आत्मकेंद्रिततेमुळे वेदनेच्या दिशेने वाटचाल केली, तर तांब्यांच्या विश्वकेंद्री वृत्तीमुळे आनंदाच्या वाटेने त्यांची कविता विकसित झाली.

९] गोविन्दाग्रज आणि तांबे या दोघांनाही मराठीतील प्रेमाचे शाहीर असे म्हटले गेले असले तरी या बिरुदावर गोविन्दाग्रजांचाच खरा हक्क पोहोचतो.

=== o === o ===

महाविद्यालयामध्ये अध्यापन करताना " हृदयशारदा " हा गोविन्दाग्रजांचा आणि " प्रणयप्रभा " हा भा.रा.तांब्यांचा काव्यसंग्रह शिकविण्याचा योग आला. प्रणयभावनेला प्राधान्य देऊन काव्यलेखन करणाऱ्या या दोन कवींमध्ये काही बाबतीत साम्य तर बऱ्याच बाबतीत वैषम्य आढळते. दोघांनी आपल्या कवितांतून प्रेमाचे माहात्म्य स्पष्ट केलेले आहे. गोविन्दाग्रज " प्रेम तरंगे चित्त तरंगे, आत्माही रंगे। जगत् रंगले, विश्व रंगले एक प्रेम रंगे। " असे सांगतात. " प्रेम नसे तर जीव नको हा। प्रेमे जग चाले " असे त्यांचे म्हणणे आहे आणि म्हणून प्रेमशून्य जीवनाचा ते धिक्कार करतात. निष्प्रेम जीवनाचा धिक्कार करताना ते म्हणतात -

" निष्प्रेम चिरंजीवन ते।
जगि दगडालाहि मिळते।। धिक् तया।।
क्षण एक पुरे प्रेमाचा
वर्षाव पडो मरणांचा। मग पुढे।। "

भा.रा.तांब्यांनी प्रेमाचा असाच गौरव केलेला आहे. " काय कळेना तुम्हां जगी या काय प्रीति न करी ? " असा प्रश्न ते करतात. ते प्रिया हेच आपले सर्वस्व मानतात आणि " मला आळशा पुरे प्रिया आणि ओठावरली मुरली " असे सांगतात. आपल्या प्रियेच्या लोचनांमध्ये त्यांना या जगात अगाध आणि दुर्मिळ असलेले असे काहीतरी दिसते. ते म्हणतात -

" या डोळ्यांच्या खिडक्याभीतरि
अफाट अनुपम दिसे माधुरी

प्रिये जिवलगे, काळिज त्यावरि
टाकिन कुरवंडुनी. "

गोविन्दाग्रज आणि तांबे हे दोघेही प्रेमाचा असा महिमा गातात. आपल्या काव्यात प्रणयभावनेला प्राधान्य देतात. पण त्यांची प्रेमाभिव्यक्ती परस्परभिन्न दिशांनी विकसित झालेली दिसते. गोविन्दाग्रजांची प्रेमकविता वेदनेच्या दिशेने वाटचाल करते, तर तांब्यांची प्रेमकविता आत्मसमाधानाचा आणि तृप्तीचा मार्ग चोखाळते.

असे घडण्यामागे अनेक कारणे असू शकतात. गोविन्दाग्रजांच्या वाटयाला जीवनात स्थिरता अशी कुठेच आली नाही, तर तांबे यांचे जीवन बहुतांशी स्थिरस्वरूपाचे राहिले. गोविन्दाग्रजांचे वैवाहिक जीवन विफल राहिले, तर तांब्यांना आपल्या सावळ्या बायकोत परमेश्वरत्व गवसले. पहिल्याची दृष्टी बाहय सौंदर्याचा अभिलाष बाळगणारी, तर दुस-याची दृष्टी बाहयसौंदर्यापेक्षा आंतरिक सौंदर्याला जाऊन भिडणारी. तांब्यांच्या ठिकाणी आस्तिक्यबुध्दी होती आणि म्हणून त्यांच्या ठिकाणी एक आशावाद आला, आनंदवाद आला असे सांगितले जाते, पण केवळ आस्तिक्यबुद्दीतून या गोष्टी निर्माण होऊ शकल्या, तर गोविन्दाग्रज हे सश्रध्द होते, त्यामुळे त्यांच्या ठिकाणीही या गोष्टी दिसावयास हव्या होत्या. मग गोविन्दाग्रजांच्या कवितेत एक आर्तता आणि दुःखाच्या जिवघेण्या वेणा का आढळाव्यात ? त्यांच्या प्रेमकवितेत भळभळणा-या हृदयाचा आविष्कार का व्हावा ? माझ्या मते गोविन्दाग्रजांची विशिष्ट प्रेमवृत्ती त्याला कारणीभूत होती. त्यांच्या या प्रेमवृत्तीला जीवनातील काही कटू अनुभव

कारणीभूत झाले असतीलही, तथापि तेवढयाने गोविन्दाग्रजांच्या वेदनेचे स्वरूप यथार्थपणे व्यक्त होण्याजोगे नाही. गोविन्दाग्रजांच्या नैराश्यामागे दोन प्रमुख कारणे आहेत असे मला वाटते. एक म्हणजे त्यांच्या ठिकाणी बाहय सौंदर्याची उत्कट अभिलाषा होती आणि दुसरे म्हणजे ते आत्मकेंद्रित होते.

गोविन्दाग्रज आणि भा.रा.तांबे यांच्या प्रेमवृत्तीमध्ये खरा फरक आहे तो याच केंद्रस्थानाचा. गोविन्दाग्रज स्वत:तच गुरफटलेले होते. आपल्या बाहेर त्यांची प्रेमवृत्ती पाहू शकत नव्हती. उलट भा.रा.तांब्यांच्या प्रेमवृत्तीला सर्व जगताबद्दल एक जिव्हाळा आणि ओढ होती. गोविन्दाग्रजांच्या आत्मकेंद्रित वृत्तीमुळे त्यांची प्रेमकविता वेदनेच्या अंगाने फुलली, तर तांब्यांच्या विश्वस्पर्शी प्रेमवृत्तीमुळे त्यांची प्रेमकविता तृप्तीच्या अंगाने खुलली. तांब्यांच्या ठिकाणी जी तृप्ती आणि आनंदवाद दिसतो, तो त्यांच्या विश्वकेंद्री वृत्तीमुळेच होय. या दोघांच्या प्रेमकवितांच्या तौलनिक अभ्यासातून हाच निष्कर्ष निघतो. या लघु-शोधप्रबंधात त्यादृष्टीने या दोन कवींच्या प्रेमकवितांची पाहणी केलेली आहे.

गोविन्दाग्रज आणि तांबे यांच्या प्रेमकवितांचा विचार करताना एकूण मराठी प्रेमकवितेने वेगवेगळया काळी जी वेगवेगळी वळणे घेतली त्यांचा स्थूल आढावा या लघु-शोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात घेण्यात आलेला आहे. या वळणांतील काही वळणांचा या दोन कवींच्या प्रेमकवितेशी संबंध येतो. गोविन्दाग्रजांच्या प्रेमकवितेवर पूर्वसूरींचा मोठा संस्कार आहे आणि तिचा धागा पुढील कालखंडातील

कवितेपर्यन्त पोहोचलेला दिसतो. तांब्यांच्या प्रेमकवितेच्या बाबतीतही असेच म्हणता येते. त्यामुळे मराठी प्रेमकवितेतील काही महत्त्वपूर्ण टप्प्यांचा हा आढावा घेणे भाग पडले आहे. मराठी प्रेमकवितेतील विविध वळणांशी या कवींचा कितपत संबंध पोहोचतो, तो ध्वनित व्हावा, त्याचप्रमाणे मराठी प्रेमकवितेतील या उभयकवींच्या स्थाना-बद्दल थोडीफार कल्पना यावी यादृष्टीने हा आढावा उपयुक्त होण्याजोगा आहे.

दुस-या प्रकरणामध्ये गोविन्दाग्रजांच्या प्रेमकवितेमध्ये आढळणा-या वैशिष्टयांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या प्रेमकवितेशी निगडित असलेल्या गोष्टींचा उलगडा होण्यास मदत होईल एवढयापुरते त्यांचे थोडक्यात जीवनचरित्र दिले आहे. गोविन्दाग्रजांच्या प्रेमवृत्तीचा नीटसा उलगडा होण्याच्या दृष्टीने तिच्यात आढळणा-या विविध छटा या प्रकरणात दाखवून दिल्या आहेत. त्यांनी वारंवार केलेला प्रेमाचा गौरव स्पष्ट करुन या प्रेमासंबंधी त्यांच्या मनाच्या विविध प्रतिक्रिया यात दाखवून दिल्या आहेत. या प्रेमवृत्तीला सावधगिरीचा इशारा देऊनही ती स्वत:ला कशी झोकून देते याचे चित्र गोविन्दाग्रजांच्या कवितेत उमटले आहे. त्यांच्या प्रेमकवितेत निरभिलाष प्रेमाबरोबर साभिलाष प्रेमाचा मोठा आढळ होतो. एका बाजूने शारीरिक प्रेमाचा आविष्कार करणारी त्यांची प्रेमवृत्ती दुस-या बाजूने मधुराभक्तीचा आनंद लुटताना दिसते. तथापि निराशप्रेमाचे चित्रण हाच गोविन्दाग्रजांच्या प्रेमवृत्तीचा व्यवच्छेदक विशेष होय. त्यांच्या प्रेमकवितांत आशा-निराशेच्या खेळाचे

चाललेले पर्यवसान शेवटी घोर निराशेत होते आणि मग या प्रेमिकाचे शून्य मन एक आर्तसाद घालत आपल्यासमोर येते. गोविन्दाग्रजांच्या आत्मनिष्ठ कवितांतच ही आर्तता आहे असे नाही. त्यांच्या वस्तुनिष्ठ प्रेमकवितांनाही कारुण्याने घेरलेले दिसते. या प्रकरणाच्या शेवटी गोविन्दाग्रजांच्या प्रेमप्रकरणाचा विचार करण्यात आलेला आहे. कर्जत येथे घडलेले प्रेमप्रकरण हे अंतर्बाह्य पुराव्याने सिद्ध होते, पण समीक्षकांनी त्यांच्या दुस-या प्रेमप्रकरणाचा जो विशेष गवगवा केलेला आहे, तो मात्र खरा नाही असे मला मनोमन वाटते.

तिस-या प्रकरणामध्ये तांब्यांच्या प्रेमकवितेतील विविध वैशिष्टयांचा विचार करण्यात आलेला आहे. तांबे यांची कविता त्यांच्या जीवनचरित्राच्या अनुषंगाने विकसित झालेली आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनचरित्राचा संक्षिपाने आढावा घ्यावा लागलेला आहे. भास्कररावांना विविध संस्थानांत नोक-या कराव्या लागल्या. तेथील दरबारी वातावरणाचा त्यांच्या कवितेवर ठसा उमटलेला दिसतो. शास्त्रीय गायनाशी त्यांचा आलेला संबंध त्यांच्या वीणाकाव्य-निर्मितीला मोठा उपकारक ठरलेला आहे. त्यांच्या कवितेचे योग्य आकलन होण्यासाठी त्यांच्या चरित्राची माहिती सांगणे आवश्यक वाटलेले आहे. वारंवार खंडित होऊनही तांब्यांनी दीर्घकाळ काव्यलेखन केलेले आहे. त्यांच्या या काव्यलेखनातील १९२० ते १९२७ हा सुवर्णकाल ठरतो.

तांब्यांच्या प्रेमकवितेमध्ये आत्मनिष्ठा आणि वस्तुनिष्ठा असे दोन वर्ग स्पष्टपणे दिसून येतात. तांब्यांचे वैवाहिक जीवन अत्यंत सुखासमाधानाचे झाले. " वारु-प्रिया-पार्वती " हेच त्यांचे जीवित

सर्वस्व होते. तांब्यांच्या आत्मनिष्ठ प्रेमकवितांत त्यांचे पत्नीविषयीचे विविध सोज्ज्वळ भाव व्यक्त झाले आहेत. त्यांच्या या आत्मनिष्ठ प्रीतीच्या आविष्काराचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न यात करण्यात आलेला आहे. तथापि तांबे स्वत:च्याच प्रेमवृत्तीत गुरफटले गेलेले नाहीत. स्वत:च्या प्रेमाशी तन्मय होऊनही दुस-यांच्या प्रीतीविषयी मोठी सहानुभूती त्यांच्या प्रेमकाव्यात व्यक्त झालेली दिसते. त्यांनी परमनप्रवेश करून अनेक प्रसन्न अशी नाटयगीते लिहिलेली आहेत. दुस-यांच्या प्रेमक्रीडांकडे कौतुकाने पाहण्याची, त्यांच्या प्रेमाला मदत करण्याची एक उदार दृष्टी तांब्यांच्या कवितेमध्ये व्यक्त होते. कुशल परमन-प्रवेशाने अन्य स्त्री-पुरुषांच्या प्रीतीतील विविध छटा ते मनोज्ञतेने दाखवून देतात. तांबे ब्राउनिंग-प्रमाणे स्त्रीपुरुष प्रेमाचे कवी आहेत. विविध स्वभावाच्या स्त्रीपुरुषांच्या प्रेमक्रीडा ते मोठया गोडीने रंगवितात. या नाटयगीतांतही संवादकाव्य हा तांब्यांचा आणखी एक वैशिष्टयपूर्ण भाग आहे. संवादकाव्याचा हा विरळा प्रकार मराठीत आणण्याचे श्रेय तांब्यांच्याकडेच जाते.

तांब्यांच्या प्रेमकवितेचे अनेक पैलू आहेत. त्यांची नुसती विधवाविषयक प्रेमगीते घेतली तरी त्यांच्या वृत्तीतील अनेक सूक्ष्म पदर आपल्या निदर्शनास येतात. तांब्यांच्या प्रेम कवितांत अशी मोठी विविधता आढळते. त्यांच्या प्रेमकवितेत क्वचित् शारीरिकता आढळली, तरी तिचा खरा ओढा आंतरिक प्रीतीकडे आहे हे स्पष्टपणे दिसून येते. तांब्यांच्या या गीतांत विफल प्रीतीची बाजू व्यक्त झाली असली, तरी तिचा स्थायीभाव सफलतेचा आणि तृप्तीचाच आहे. तांब्यांच्या प्रेमकवितेत शारीरिक प्रेमापासून ते मधुराभक्तीपर्यन्तचे

अनेक स्तर आढळून येतात. पुन्हा त्यांच्या प्रेमभावनेचे स्वरूप विशिष्टापुरते मर्यादित राहात नाही. तिथे साधारणीकरण होते आणि त्यामुळेच त्यांची प्रेमगीते रसिकांना प्रिय होतात.

चौथ्या आणि शेवटच्या प्रकरणामध्ये गोविन्दाग्रज आणि भा.रा.तांबे यांच्या प्रेमकवितांचा तौलनिक अभ्यास सादर करण्यात आलेला आहे. या दोघांचे जीवनचरित्र,काव्यलेखन आणि काव्यप्रेरणांचा प्रारंभी विचार केलेला आहे. या दोन कवींमध्ये काही साम्यस्थळे आढळतात. दोघांनी प्रेमाचे मोठेपण आवर्जून सांगितलेले आहे. दोघांच्या प्रेमकवितेत मुग्धप्रणयाची चित्रे येतात. त्यांच्या प्रेमकवितेत मर्यादित स्पाने जसा शारीरिक शृंगार व्यक्त झालेला आहे, तसाच कल्पनाप्रधान प्रीतीच्या चित्रणाचाही भाग आलेला आहे. दोघेही प्रेमातील मधुराभक्तीचे रूप दाखवून जातात. दोघांच्या काही कवितांत कल्पना-साम्याचा भाग आढळतो. या दोन कवींत आढळणारा साम्याचा हा भाग प्रथमार्धामध्ये विस्ताराने दाखविला आहे.

या प्रकरणाच्या दुसऱ्या भागामध्ये गोविन्दाग्रज आणि तांबे यांच्यामध्ये जो असमान भाग आढळतो तो दाखवून त्याची कारणमीमांसा केलेली आहे. गोविन्दाग्रजांना बाह्यसौंदर्याचा सोस दिसतो, तर तांब्यांची दृष्टी आधिक्याने आंतरिक सौंदर्याला जाऊन भिडते. गोविन्दाग्रजांच्या प्रेमकवितांत क्वचित् कडवटपणा आणि प्रेमाचा धिक्कार आढळतो, तर तांब्यांच्या प्रेमगीतांत आरपार एक निरागसता प्रकट होते. गोविन्दाग्रजांच्या प्रेमकवितेची वाटचाल

वेदनेच्या दिशेने होते, तर तांब्यांची प्रेमकविता आत्मसमाधानात आणि तृप्तीत डुंबत असलेली दिसते. आपल्या नाटयगीतांनी आणि संवादकाव्यांनी तांब्यांनी मराठी कवितेत जशी भर घातली आहे, तशा प्रकारचे श्रेय गोविन्दाग्रजांना देता येत नाही. तांबे हे आधिक्याने स्त्रीपुरुषांचे कवी आहेत, तर गोविन्दाग्रजांच्या प्रेमकवितेत पुरुषांची मीलनोत्सुकता आणि विरहकातरता आधिक्याने आविष्कृत झालेली आहे. तांबे मराठीतील पहिले वीणाकवी होत. त्यांच्या कवितेत जशी लयकारिता आणि संगीतमयता आहे तशी गोविन्दाग्रजांच्या कवितेत आढळत नाही.

तांब्यांनी आपल्या काव्यलेखनामागील विचारसरणी जशी स्वत:च सांगून टाकली आहे. तशी संधी गोविन्दाग्रजांना प्राप्त झालेली दिसत नाही. तांब्यांनी आपली कलावादी आणि आनंदवादी विचारसरणी मांडून आपल्या काव्यलेखनावर प्रकाश टाकलेला आहे. गोविन्दाग्रजांच्या बाबतीत ही गोष्ट आढळत नाही. दोघांच्या भाषाशैलीत आणि रीतीतही फरक आहे. गोविन्दाग्रजांची रीती गौडी रूपाकडे झुकते तर तांब्यांची लाटी रूपाकडे कललेली आढळते.

गोविन्दाग्रज आणि तांबे यांच्या प्रेमकवितेत असा फरक आढळला तरीही प्रेमकवी या नात्याने मराठी कवितेतील त्यांचे स्थान अक्षुण्ण राहणारे आहे. दोघांची बलस्थाने भिन्न भिन्न आहेत आणि आपापल्या बलस्थानाप्रमाणे त्यांनी मराठी प्रेमकवितेला आपापल्या परीने वेगळे परिमाण प्राप्त करून दिलेले आहे.

या प्रकरणाच्या शेवटी मराठीतील प्रेमाचे शाहीर कोण, या प्रश्नाचा विचार करून गोविंदाग्रजांनाच मराठी कवितेतील प्रेमाचे शाहीर मानणे औचित्यास धरून होईल असे सांगण्यात आले आहे.

मार्गदर्शक. अभ्यासक.